# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

### फसवणुक

**पो.स्टे. पारशिवनी** :— पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दिनांक ११/११/२०२२ रोजी तक्रारदार श्री. सुभाष परसराम जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांनी गैरअर्जदार श्रीमती सरिता चंद्रशेखर नेवारे, कनिष्ठ सहायक लिपीक, पंचायत समिती पारशिवनी चे विरूद्ध तक्रार दिली की, त्यांनी आपले पदाचा गैरउपयोग करून त्यांचेकडे सोपविण्यात आलेले शासकीय कामात कार्यालयाचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त झालेले कर्मचाऱ्यांचे देयकात १७ लोकांचे बनावटी नाव टाकुन त्याचे नावासमोर इतर व्यक्तीचे बॅक खाते नमुद करून त्या खात्यात शासनाचे ०१,८६,५७,१२५/—रूपयाची अफरातफर करून शासनाची फसवणूक केली. करीता गैरअर्जदार यांचे विरूद्ध गुन्हा दाखल करणेबाबतचा तक्रार अर्ज चौकशीकामी प्राप्त झाला. केलेल्या चौकशीवरून गुन्हा नोंद करण्याचे परवानगी मिळणेकामी पोलीस निरीक्षक पारशिवनी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल व त्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांचे उपयुक्त अभिप्रायाचे अवलोकना अंती सविवेक बुद्धीने फसवणुक या सदराखाली गुन्हा दाखल करण्याचे आदेश नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद (भा. पो. से.) सा. यांनी दिले.

### फसवणुक

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०९ कि मी अंतरावर जूनापाणी शिवार येथे दिनांक १४/११/२०२२ चे ०७.३० वा. दरम्यान आरोपी नामे— ओमप्रकाश जूनघरे, वय ४० वर्ष, रा. खामगाव, जि. बुलढाणा याने त्याचे १० चक्का आयसर क्र एम.एच—३१/सी.बी—९१९६ मध्ये हिंदुस्थान लिव्हर कंपनीचा लक्स साबून २७५ बॉक्स, एक बॉक्स मध्ये १२५ ग्रॅम चे १५० साबण व एक बॉक्स किंमती अंदाजे १४२६.०३/—रू तसेच लाईफ बॉय साबणचे ६४५ बॉक्स (एका बॉक्स मध्ये १२५ ग्रॅमचे १५० साबण व एक बॉक्सची किंमती २८७३.६६/— रू ) असा एकुण ९२० बॉक्स एकुण किंमती २२,४५,६७२.०८ रूपयाचा मुद्देमाल लोड करून खामगाव येथून नागपूर कडे एन.एच ५३ माहामार्गाने जात असता फिर्यादीचा वरील मुद्देमालपैकी सदर आरोपी ट्रक ड्रायव्हरने फिर्यादीचा विश्वासघात करून ९२० साबणचे बॉक्सपैकी अंदाजे ५७० बॉक्स ड्रायवरने काढून घेतले. त्यामध्ये लक्स साबणचे १२५ बॉक्स एकुण किमती १,७८,२५३.७५/—रू. व लाईफबॉय साबणाचे ४४५ बॉक्स किंमती १२,७८,७७८.७०/—रू. असा एकुण किंमती १४,५७,०३२.४५/— रूपयाचा मुद्देमाल अफरातफरी करून फिर्यादीची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अजितसिंग बवरसिंग शेखावत, वय २६ वर्ष, रा. एम. आय. डी. सी. खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४०६, ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कोंढाळी करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**